**वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ,**
कृषि नगर, वसमत रोड,
परभणी - ४३१ ४०२ (महाराष्ट्र)

| ई-मेल | : reg_mau@rediffmail.com | दूरध्वनी | : (०२४५२) २२९७५५ |
|---|---|---|---|
| वेबसाईट | : www.vnmkv.ac.in | फॅक्स | : (०२४५२) २२९७५५, २२३५८२ |


क्र. २०२०/पदो.सहयोगी प्रा/प्र.क्र.४/आस्था-१ दिनांक : ११.११.२०२०

## परिपत्रक

विद्यापीठांतर्गत **सहायक प्राध्यापक** यांना या परिपत्रकाद्वारे सूचित करण्यात येते की, जे सहायक प्राध्यापक स्वत:स दिनांक ३१.१२.२०२० पर्यंत **सहयोगी प्राध्यापक या पदावर** पदोन्नतीसाठी पात्र समजतात अशा सर्व सहायक प्राध्यापक यांनी पदोन्नतीबाबतचा दावा, सर्व अनुषंगिक कागदपत्रासहीत (आचार्य पदवी अधिसूचना/प्रमाणपत्राची छायाप्रत/ विभागीय लेखा परिक्षा उत्तीर्ण असल्याबाबतच्या निकालाची छायाप्रत/ मराठी/हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण /कुटुंब मर्यादा प्रमाणपत्र/ अद्ययावत (मागील ०५ वर्षाचे सन २०१९-२० पर्यंत) शैक्षणिक कामगिरी निर्देशांक (**Academic Performance Indicator- Category- I, II & III** ) बाबतची कागदपत्रे (ज्या अधिका-यांचे यापूर्वी कॅस अंतर्गत स्कोअर कार्ड तयार झालेले आहेत अशा अधिका-यांनी **Category- I, & II** बाबतची कागदपत्रे त्या पुढील कालावधीची सादर करावीत), मागील वर्षाचे मत्ता व दायित्व विवरणपत्र सादर केल्याचा पुरावा इत्यादीसह कुलसचिव कार्यालयाकडे **दिनांक ३१.१२.२०२०** पर्यंत पुढील कार्यवाहीस्तव सादर करावेत, जेणे करून आगामी विभागीय पदोन्नती समिती समोर आपला पदोन्नतीबाबत विचार करण्यात येईल.

सदरची कागदपत्रे सादर करण्यास विलंब झाल्यास, विभागीय पदोन्नती समिती समोर पदोन्नतीबाबतचा दावा सादर करता येणार नाही यांची कृपया नोंद घ्यावी. तसेच जे सहायक प्राध्यापक पदोन्नती करीता पात्र नाहीत त्यांनी त्यांचे बायोडाटा सादर करून नयेत. पात्र नसतांना अनावश्यक पत्रव्यवहार केल्यास किंवा बायोडाटा सादर केल्यास संबंधीत कर्मचाऱ्यांनी अनावश्यक पत्रव्यवहार केल्याबाबत प्रशासकिय कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

तसेच सर्व नियंत्रण अधिकारी यांना सूचित करण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेले असून, सदरील परिपत्रकाची प्रत मुद्रीत स्वरूपात उपलब्ध (Download) करून घेवून, आपले अधिनस्त असलेल्या सर्व सहायक प्राध्यापक यांचे निदर्शनास आणावे.

(पु.को.काळे)
**कुलसचिव** (करिता)

**प्रतिलिपी :**

१. संचालक शिक्षण/संशोधन/विस्तार शिक्षण, वनामकृवि, परभणी.
२. सहयोगी अधिष्ठाता (शिक्षण), वनामकृवि, परभणी.
३. नियंत्रक/ विद्यापीठ अभियंता, वनामकृवि, परभणी

**प्रत :**

१. मा.कुलगुरू यांचे खाजगी सचिव, वनामकृवि, परभणी.
२. कुलसचिव कार्यालयातील सर्व आस्थापना कार्यासने.
३. प्रभारी अधिकारी, मध्यवर्ती संगणक केंद्र, वनामकृवि, परभणी यांना देवून सूचित करण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.